नि ८

क

# वेंगुर्ला येथील मे. दिवाणी न्यायाधीशसाहेब (क.स्तर), यांचे न्यायालयात.

रे.दि.मु.नं. २/२०२६

श्री. चंद्रकांत नारायण खोरजुवेकर, वगैरे ९ -------- वादी

विरुध्द

श्री. वरुण नारायणन -------- प्रतिवादी

सदरकामी वादी व प्रतिवादी यांचेतर्फे संयुक्त पुरशीस अशी की,

०१) वादींनी प्रस्तुतचा दावा हा दाव्यात नमूद केल्याप्रमाणे दावा मिळकतीमधील क्षेत्र (हे.आर.) ०-४५-०० एवढे क्षेत्र वादींच्या मालकीचे आहे व उर्वरीत क्षेत्र (हे.आर.) ०-१४-०० प्रतिवादीच्या मालकीचे आहे, असा ठराव होऊन त्याचे सरसनिरस धडेवाटप होऊन मिळावे. तसेच दावा मिळकतीचे वाटप दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ५४ खालील तरतुदीनुसार व शक्यतो दावा मिळकतीमधील वादी व प्रतिवादीच्या वहिवाटीप्रमाणे मे. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या कुणाही सक्षम अधिकाऱ्यामार्फत होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. या दाव्याचे कामी वादी व प्रतिवादी यांचे दरम्याने चर्चेअंती व विचारविनिमय करुन तडजोड झालेली आहे.

०२) दावा मिळकत ही मुळ वादीच्या मालकीची मिळकत होती. सदर मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी या पुरशीस सोबत जोडलेल्या नकाशामध्ये लाल रंगाने व A-B-C-D-E-F या अद्याक्षरांनी दर्शविल्याप्रमाणे क्षेत्र (हे.आर.) ०-१४-०० हे वादीनी प्रतिवादी यांस दि. २१/ ०३ /२०२५ रोजीच्या नोंदणी क्रमांक ४०६ /२०२५ ने रस्त्याकरीत्या विक्रीत दिलेले आहे. दावा मिळकतीमधील उर्वरीत क्षेत्र (हे.आर) ०-४५-०० हे वादीच्या मालकीचे क्षेत्र आहे. हि बाब वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

Today power of attorney holder of plaintiff no.1 to 3 & 5 to 7 is present & other plaintiffs are also present. Defendant present. Both parties admitted the contents in the purshis are true & correct before their advocates. They also admitted their signatures over the purshis. Hence the purshis read & recorded.

(वादी नं.४) (वादी नं.८) (वादी नं.९)

(प्रतिवादी)

प्रतिवादीने विक्रीत घेतलेले क्षेत्र (हे.आर.) ०-१४-०० क्षेत्र वादींकडून रस्त्याकरीता विक्रीत घेतलेले आहे व त्या क्षेत्राचा प्रतिवादी हा रस्त्याकरीता वापर करीत आहे व त्याबाबत वादींची कोणतीही हरकत नाही.

०३) दावा मिळकतीमधील वरनमूद केल्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्या मालकीचे क्षेत्र असून सदर क्षेत्र वादी व प्रतिवादी यांनी आपापासात तडजोड करुन मालकीहक्काने उपभोगण्याचे ठरवलेले आहे. त्याप्रमाणे या तडजोड पुरशीससोबत जोडलेल्या नकाशामध्ये लाल रंगाने व A-B-C-D-E-F दर्शविल्याप्रमाणे दावा मिळकतीमधील क्षेत्र (हे.आर.) ०-१४-०० हे क्षेत्र प्रतिवादीने पूर्ण मालकीहक्काने उपभोगावयाचे आहे. तर दावा मिळकतीमधील उर्वरीत क्षेत्र (हे.आर.) ०-४५-० एवढे क्षेत्र वादी नं. १ ते ९ यांनी एकत्रात मालकीहक्काने उपभोगावयाचे आहे, असे वादी व प्रतिवादी यांच्या दरम्याने ठरलेले आहे.

०४) प्रतिवादी यांच्या मालकीहक्काच्या नकाशात दर्शवलेल्या क्षेत्रामध्ये प्रतिवादीच्या वहीवाटीस वादी यांनी अथवा त्यांच्या मार्फत अन्य कोणीही कधीही कसल्याही प्रकारची हरकत अडथळा करावयाचा नाही. तसेच प्रतिवादीच्या मालकीच्या सदर (हे.आर.) ०-१४-०० (१४ गुंठे) क्षेत्राचा उपभोग घेण्याचा व सदर क्षेत्र मर्जीनुरुप वापर करण्याचा प्रतिवादीस कायम अधिकार व हक्क राहील.

०५) वादी यांच्या मालकी हक्काच्या (हे.आर.) ०-४५-०० (४५ गुंठे) क्षेत्रामध्ये वादींच्या वहीवाटीस प्रतिवादी यांनी अथवा त्यांच्या मार्फत अन्य कोणीही कधीही कसल्याही प्रकारची हरकत अडथळा करावयाचा नाही.

०६) वादी व प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमधील क्षेत्राचे वाटप दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम ५४ खालील तरतुदीनुसार व वादी व प्रतिवादीच्या वहिवाटीप्रमाणे व पुरशीससोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे मे. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या कुणाही सक्षम अधिकाऱ्यामार्फत करुन घ्यावयाचे आहे. त्याकरीता वादी व प्रतिवादी यांनी एकमेकांना सहकार्य करावयाचे आहे.

०७) अशाप्रकारे वादी व प्रतिवादी यांचे दरम्यानचा दावा मिळकतींबाबतचा वाद मिटलेला असून त्यांची आपापसात तडजोड झालेली आहे. त्याप्रमाणे प्रस्तुत दावा निर्णित करण्यास वादी व प्रतिवादी यांची कोणतीही हरकत नाही व त्याप्रमाणे हुकूमनामा पारीत करणेत यावा व प्रस्तुतची पुरशीस व त्यासोबतचा नकाशा सदर हुकूमनाम्याचा महत्वाचा भाग ठरविणेत यावा, म्हणून दाखल केली संयुक्त तडजोड पुरशीस.

**वेंगुर्ला**

**दि.** १४/०३/२०२६

**(श्री. नारायण महादेव खोरजुवेकर)**

(वादी नं.४ स्वत:करीता व वादी नं.१ ते ३ व ५ ते ७ तर्फे अखत्यारी)

**(ॲड.कु.व्ही.एस्.कामत)**

(वादींतर्फे वकील)

**(श्रीम. सुलोचना हनुमान कृष्णाजी)**

**(पूर्वाश्रमीची कु. शालीनी नारायण खोरजुवेकर)**

(वादी नं.८)

**(श्रीम. सुनीता सुर्यकांत होडावडेकर)**

**(पूर्वाश्रमीची कु. मेघा नारायण खोरजुवेकर)**

(वादी नं.९)

**(ॲड.श्री.एस्.के.मराठे)**

(प्रतिवादीतर्फे वकील)

**(श्री. वरुण नारायणन)**

(प्रतिवादी)

रे.दि.मु.नं. ०२/२०२६.


## * अंकुक तडजोड पुरशिस लगत जोड

गा.नं. ३८ हि.नं. १

अनुमतीच्या टीपा -:

- लाल रंगाने व ABCDEF या अद्याक्षरांनी दर्शविलेले (हे.आर.) ०-१४-०० एवढे क्षेत्रामध्ये रस्ता असून ते प्रतिवादीच्या मालकीचे क्षेत्र आहे.

- वादी नं. १ ते ९ यांच्या मालकीचे क्षेत्र (हे. आर.) ०-४५-००.




सदरचा हस्त नकाशा आम्हांला मान्य व कबुल आहे. ता. /03/2026.

N. Ranjurelkar (वादी) नं.४

(प्रतिवादी)

सुलोचना ह. कुलकर्णी (श्रीमती सुलोचना ह. कुळकर्णी) (वादी नं. ८)

सुनीता सु. होडावडेकर (सुनीता सु. होडावडेकर) (वादी नं. ९)